# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**जावक क्रमांक :- २०३** **दिनांक :- २६/०७/२०२१**

## भाईंदर (प.) येथील अत्यंत क्लिष्ट खुनाच्या गुन्हयाची उकल करुन ३ आरोपी ताब्यात- गुन्हे शाखा युनिट १ काशिमीरा यांची कामगिरी.

दिनांक २१/०७/२०२१ रोजी १५-०० वा. ते २२-१५ वा. चे सुमारास फिर्यादी श्री लाला सुग्रीव वर्मा, वय - ३१ वर्षे, व्यवसाय – नोकरी, रा. रुम नं. १०८, गल्ली नं. ०४, स्मशान भुमीजवळ, गांधीनगर भोलानगर, भाईदर पश्चिम यांची पत्नी सौ. सुमन लाला वर्मा वय २६ वर्ष हया घरात एकटया असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीत याने चोरी करण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी साधनाने त्यांचा गळा आवळुन जिवे ठार मारुन त्यांचे अंगावरील ३५,८००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व बॅगेत असलेले आधारकार्ड, एटीएम कार्ड व इस्त्री, सांऊन्ड बॉक्स असे सामान चोरी करुन लुटून नेले आहे, बाबत तक्रारदार श्री लाला वर्मा यांनी फिर्याद दिल्याने भाईंदर पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I २८६ /२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३९६ प्रमाणे दि. २३/०७/२०२१ रोजी ००.५२ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात प्रथमदर्शनी कोणत्याही प्रकारचा पुरावा किंवा श्रृंखला नसतांना गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा, यांनी गुन्हयातील घटनास्थळवरुन मिळालेल्या प्राथमिक माहितीवरुन व तांत्रीक बाबींचा वापर करुन तसेच साक्षीदारांकडे विचारपूस करुन सदरचा गुन्हा कुणी केलेला असावा याची अचुक माहिती काढून गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलीस पथक जि. बलीया, राज्य उत्तर प्रदेश येथे वरिष्ठांचे परवानगीने रवाना झाले. सदर पथकाने उत्तर प्रदेश मध्ये एस.टी.एफ. पथकाची मदत घेवून वर नमुद गुन्हयातील संशयीत आरोपीतांचा शोध घेवून संशईत नामे १) सोनु विजय चौहान, वय ३० वर्षे, रा. ग्राम गालाफपुर पकहा, ता. बासरी कचेरी, जि.बलीया, राज्य उत्तर प्रदेश २) सुधीरकुमार तुलसी चौहान, वय १९ वर्षे, रा. ग्राम कुसबरी, ता. सहतवार, जि.बलीया, राज्य उत्तर प्रदेश व ३) मुन्नी कुलदीप चौहान, वय ३२ रा. ४७ रक्षा डिनीया, जि. बलीया, राज्य उत्तर प्रदेश यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा चोरी करण्याचे उद्देशाने केल्याची कबुली दिलेली आहे. सदरील गुन्हयामध्ये कुणीही प्रत्यक्षदर्शि व्यक्ती किंवा पुरावा नसतांना गुन्हे शाखेने अत्यंत कौशल्यपुर्ण तपास करुन यातील अज्ञात आरोपीतांचा सहभाग निष्पन्न करुन सदरचा गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, अति.कार्यभार (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. जितेंद्र वनकोटी, मध्यवर्ती गुन्हे शाखा, पोनि. अविराज कुराडे, सपोनि. विलास कुटे, निलेश शेवाळे, पोउपनि. हितेंद्र विचारे, सहा.पोउपनि. वेदपाठक, राजु तांबे, पोहवा/३६ संदीप शिंदे, किशोर वाडिले, अर्जुन जाधव, संजय शिंदे, अविनाश गर्जे, पोना/३०८ पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, पो.शि./३६८७ विकास राजपुत, सर्व नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ तसेच मध्यवर्ती प्रकटिकरण कक्षाचे पो.शि./३५२ सतीश जगताप व पो.शि./१८६७ महेश वेल्हे यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

----oooo----